MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI PUNE 17

# "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार"

– प्रा. मीना तुळशीराम बांबळे

भारताच्या पावन भूमीवर अनेक थोर महापुरुषांचा जन्म झाला. त्या सर्व महापुरूषांनी आपल्या देशासाठी आणि समाजासाठी त्यांचे संपूर्ण आयुष्य समर्पित केले, अशाच या थोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कारिकीर्दीत भारतातील शेती क्षेत्र तसेच प्रादेशिक पातळीवरील महत्त्वपूर्ण समस्यांचा अगदी बारकाईने अभ्यास केला आहे. समाजाचे आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याच्या संदर्भात त्यांचा शेती क्षेत्रातील प्रश्न व शेती जमिन सुधारण्याविषयक दृष्टीकोन महत्त्वाचा समजला जातो. शेतीची समस्या सोडविण्यासाठी औद्यागिकीकरणाचा विकास हा महत्त्वपूर्ण उपाय आहे असे त्यांनी प्रतिपादन केले, 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' आणि 'दलितांचे उदारक असलेल्या बाबासाहेबांची विविध रूपे सर्वपरिचित आहेत. ते केवळ संकल्पनात्मक नव्हते, तर ते व्यावहारिक असल्याची अनुभूती त्यांच्या अध्ययनातून मिळते. (बाबासाहेबांनी अर्थशास्त्राचे देखील अध्ययन सखोल असल्याची कार्यभूती आंतरराष्ट्रीय दर्जाची समजली जाते.) आंबेडकर हे उच्चशिक्षित अर्थवक्ते होते.. हिताय, बहुजन सुखाय या मंत्रातूनच त्यांचे आर्थिक विचार स्पष्ट दिसून येतात.

**परिचय –**

बहुजन भीमराव रामजी आंबेडकर तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१४ एप्रिल १८९१ ते ६ डिसेंबर १९५६ ) मुळचे मध्यप्रदेशातील महू येथे जन्म झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वडिलांचे नाव रामजी व आईचे नाव भीमाबाई होते. मुंबईत वास्तव्यास असताना त्यांनी प्राथमिक शिक्षण घेतले. अगदी वयाच्या १४–१५ वर्षी बाबासाहेबांचा दापोली येथील भिकू वलगकर यांची मुलगी रमाबाई यांच्याशी त्यांचा विवाह झाला. शिक्षणाप्रती असलेली त्यांची गोडी यातून त्यांच्या प्रभावशाली जीवनशैलीचा आढावा पहावयास मिळतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या शिक्षण संस्थांमधून अर्थशास्त्र विषयात पीएच. डी. पदवी मिळविली. त्यांनी आपल्या शिका, संघटीत व्हा संघर्ष करा यातून समाजाला शिक्षण व सामान्याला न्याय देण्यासाठी लढण्याचा संदेश दिला. त्यांनी अर्थशास्त्र,

राजशास्त्र आणि कायदा यावर सखोल संशोधन केले. सुरवातीला त्यांनी अर्थशास्त्र प्राध्यापक आणि वकीली पेशा स्विकारला. त्यांच्या आर्थिक परिस्थितीतून मिळालेल्या अनुभवावरून त्यांनी सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात काम केले.

MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI, PUNE-17

**आर्थिक विचार –**

१९१३ मध्ये कोलंबिया विद्यापीठात जाऊन 'ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन आणि वित्तीय व्यवस्था' या प्रबंधातून त्यांनी अर्थशास्त्रातील एम. ए. पदवी मिळवून यात त्यांनी 'जमीनदारी व रयतदारी पद्धत', मिठावरील कर, कस्टम ड्यूटी व स्टॅम्प ड्यटी इ. चा तर्कशुद्ध विचार मांडला. आश्चर्य करणारी बाब म्हणजे १७९२–९३ पासून १८५७ या वर्षात भारतातील ६६ वर्षामध्ये कंपनीकडून ब्रिटीश सरकारकडे जमा झालेला एकूण महसूल आणि केलेल्या खर्चाची वर्षावार आकडेवारी याचे विश्लेषण यात दिले आहे. यातून आंबेडकरांच्या असे निदर्शनास आले की, कंपनीचे संपूर्ण वित्तीय धोरण हे भारताला लुबाडणारे, आर्थिक शोषण करणारे होते. त्यानंतर बाबासाहेबांनी वयाच्या २६ व्या वर्षी पीएच. डी. साठी 'National Dividend A Historical and Analytical Study' हा विषय निवडून तो कोलंबिया विद्यापीठात सादर केला. ब्रिटीश काळातील प्रांतिक वित्तीय व्यवस्थेचा विकास या नावाने तो प्रसिद्ध करून बाबासाहेबांना पीएच. डी. प्रदान करण्यात आली. यासाठी त्यांनी १८३३ ते १९२०–२१ पर्यंतचा अर्थात ६७–८८ एवढ्या कालावधीत भारताच्या वित्तीय व्यवस्थेचा अभ्यास केला. या अभ्यासात त्यांनी केंद्र व प्रांतिक सरकारचे वित्तीय संबंध कसे बदलले, वित्तीय रचनेमुळे केंद्र व प्रांतिक सरकारच्या कर उत्पन्नातील वाटपाच्या व्यवस्थेतील बदल, अर्थसंकल्पातील स्वरुपातील बदल कसे होत गेले इ. मुलगामी संशोधन केले. याप्रबंधात विशेषतः प्रांतिक सरकारच्या जबाबदाऱ्या लक्षात घेऊन करांच्या रुपात मिळविलेल्या उत्पन्नाचे न्याय वाटप व प्रांतात कसे करावे याबद्दलचे मत मांडले.

बाबासाहेबांनी 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये' डी. एस्सी. साठी त्यांनी 'रुपयाचा 'प्रश्न' हा प्रबंध लिहिला सार्वजनिक वित्तीय व्यवस्था या क्षेत्रातील अर्थशास्त्रज्ञ प्रा. मडविन आर. ए. सेलिगमन हे आंबेडकरांचे प्रबंधाचे मार्गदर्शक होते. या अभ्यासात त्यांनी १८०० ते १८९३ पर्यंतचा जवळपास १०० वर्षाच्या कालखंडात विनिमयाचे साधन म्हणून भारतीय रुपयाची उत्क्रांती भारताला कोणत्या परिमाण पद्धती अनुकूल ठरेल याचे अर्थपूर्ण विवेचन केलेले आहे. विनिमय पद्धतीतील अर्थव्यवस्थेमध्ये संपूर्ण नफ्याचा किंवा कागदी चलनामध्ये अनेक अर्थशास्त्रामध्ये संभ्रम होते. बाबासाहेबांच्या मते, रुपयांचे मूल्य स्थिर राहण्यासाठी चलन निर्मितीवर नियंत्रण याचबरोबर लोकांप्रमाणे सरकारलाही टांकसाळी बंद

केल्या पाहिजे, जेणेकरून चलनाच्या अतिरिक्त निर्मितीमुळे चलन फुगवटा होऊन महागाई वाढेल त्याचा परिणाम आंतरराष्ट्रीय पातळीवर रुपयाचे मूल्य कमी होईल देश परकीय कर्जाचा भाराखाली राहत आर्थिक स्वातंत्र्य व पर्यायाने सार्वभौमत्वाचा प्रश्न निर्माण होईल. त्यासाठी अपरिवर्तनीय रुपयाचा प्रश्न स्थिर ठेवण्यास भारताने योग्य ती वाटचाल केली पाहिजे असा विचार त्यांनी प्रबंधात मांडला. बाबासाहेबांच्या व्यापक अभ्यासातून निष्पन्न होते की, ते आंतरराष्ट्रीय दर्जाचे अर्थतज्ञ होते.

सामाजिक व राजकीय क्षेत्रात आमुलाग्र कामगिरी केली. हिंदू धर्मातील परंपरा, चाली, रुढी याना कंटाळून त्यांनी इ.स. १९५६ मध्ये आपल्या अनुयायांसह बौद्ध धर्म अंगीकारला. दलित जनतेसाठी त्यांनी मोलाचे काम केले. जनतेला एकत्रीकरणासाठी त्यांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा (१९२४) स्थापन केले. १९३६ साली 'स्वतंत्र मजूर पक्ष' या राजकीय पक्षाची स्थापन केली तर, 'ऑल इंडिया शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन' या संस्थेची (१९३२) स्थापना केली. मूकनायक, जनता अशा नियतकालिकांद्वारे समाजात जागृती निर्माण केली. बहिष्कृत भारताचे ते संस्थापक होते. त्यांनी 'हूं बेअर दि शुद्रान?', 'बुद्ध ॲण्ड हीज धम्म' इ. अनेक ग्रंथ लिहिले आहेत. १५ ऑगस्ट १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताचे कायदा मंत्री झाले. त्यांनी अनटचेबल हा इंग्रजी ग्रंथ लिहिला. भूमीहीन मजूर, अल्पभूधारक,खोतीपद्धती, महावतन, सामुदायिक शेती, जमीन महसूल आणि जमीनदारशाहीचे उत्पादन विषयावर त्यांनी निरनिराळ्या वेळी आपले मत व्यक्त केले आहे. अशा अनेक विविध क्षेत्रात त्यांनी मोलाचे योगदान दिले.

१९९० मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मरणोत्तर 'भारतरत्न' हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान करण्यात आला. तर २०१२ मध्ये 'द ग्रेटेस्ट इंडियन' नावाच्या सर्वेक्षणात आंबेडकरांची सर्वश्रेष्ठ भारतीय म्हणून निवड करण्यात आली आहे. अशा या महामानवाने ६ डिसेंबर १९५६ साली आपला अखेरचा श्वास घेतला आणि आपल्या कार्याचा ठसा प्रत्येक क्षेत्रात मागे उमटवला.

**संदर्भ सूची –**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार, डॉ. भारती जगताप यादव, महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी, पुणे १७, पान क्र., डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार आणि कार्य, डॉ. राजेश बगारे

२) (बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ), औरंगाबाद. आगलावे प्रदिप, समाजशास्त्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पुणे, सुगावा बुक्स पब्लिशर्स, पृ. क्र. २९.

३) अर्थशास्त्रात आंबेडकर, महाराष्ट्र टाईम्स, डॉ. भालचंद्र मुणगेकर, एप्रिल १४ २०२१.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार, राजेंद्र घावे, इतिहास विभाग प्रमुख रामदास महाविद्यालय, जालना, पान क्र. २.

५) लोकशाही विषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार Cheif Editor Promod P Tandale. http://www.airjournal.com.

६) मनोहर सोनकांबळे, विद्यापीठ, माध्यमशास्त्र संकुल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार आणि आजच्या शोषक अर्थव्यवस्थेत वास्तव.

MAHATMA PHULE MAHAVIDYALAYA PIMPRI, PUNE-17